सकाळ

# विद्यार्थ्यांनी साधला पोलिसांशी संवाद

## ‘जीवनमूल्य प्रकल्पां’तर्गत उपक्रम

**देहू, ता. २ :** पंख सामाजिक संस्था आणि क्विक हील फाउंडेशन यांनी 'जीवनमूल्य प्रकल्पा'अंतर्गत देहू येथील रयत शिक्षण संस्थेच्या संत तुकाराम व संत जिजाबाई विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'पोलिसांशी थेट भेट' हा कार्यक्रम आयोजित केला होता.

वयात येणाऱ्या मुला-मुलींना खरे प्रेम, खरी मैत्री व आकर्षण, हे समजावणे आणि पॉस्को कायद्याची जागृती करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. क्विक हिल टेक्नॉलॉजीच्या मानुष्यबळ विकासच्या उपाध्यक्षा अनुपमा काटकर, देहूरोड ठाण्याचे सहायक निरीक्षक शाहिद पठाण, महिला पोलिस उषा दळे, उज्वला धनवट, पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, फाउंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के, संत तुकाराम विद्यालयाचे मुख्याध्यापक ईश्वर जगताप, संत जिजाबाई विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शुभांगी पंडित उपस्थित होत्या.

सहायक निरीक्षक पठाण यांनी मुलांना पॉस्को कायद्याविषयी माहिती दिली. पंख संस्थेच्या समुपदेशक क्षितिज शिर्के आणि सचिन करंजुले यांनी प्रेम मैत्री आकर्षणावर रोल प्ले सादर केले.